महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीतर्फे सन २०१८-१९ चे पुरस्कार प्रदान सोहळा आयोजन खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. सिंसाअ ७२१९ (११)/प्र.क्र.२१२/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. सिंसाअ ७२१५ (१४)/प्र.क्र.२३१/सां.का.४, दिनांक १ एप्रिल, २०१६
२) सहसंचालक, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी यांचे पत्र क्र. मरासिंसाअ/१३२६/२०१९, दिनांक १९ जुलै, २०१९

प्रस्तावना :-

उपर्निर्दिष्ट संदर्भ क्र. १ नुसार महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीतर्फे सिंधी साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य व भरीव योगदान देणा-या साहित्यिकांना पुरस्कार प्रदान केले जातात. त्यानुसार, सन २०१८-१९ चे पुरस्कार प्रदान सोहळा आयोजनासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीतर्फे घोषित करण्यात आलेल्या सन २०१८-१९ चे पुरस्कार प्रदान सोहळयाच्या आयोजनासाठी येणा-या रुपये ८,७१,५००/- (रुपये आठ लाख एकाहत्तर हजार पाचशे फक्त) इतक्या खर्चास खालील तपशीलानुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	तपशील	प्रस्तावित खर्च (रु.)
१.	**मानचिन्ह**	३५,०००/-
	अ. अखिल भारतीय जीवनगौरव सन्मान पुरस्कार (१)	
	ब. सिंधी साहित्य क्षेत्रातील पुस्तक/ग्रंथांना साहित्य/वाङमय पुरस्कार (४)	
	क. इतर पुरस्कार	
	१. पत्रकारिता पुरस्कार (१)	
	२. अनुदान पुरस्कार (१)	
	३. काव्य पुरस्कार (१)	
	४. नवोदिन साहित्यिक पुरस्कार (१)	
	(एकूण ९ मानचिन्हे)	

२.	१. निमंत्रण पत्रिका, जाहिरात व बॅनर - डिझाईन रुपये ५,०००/-	५९,०००/-
	२. निमंत्रण पत्रिका व बॅनर - छपाई रुपये २०,०००/-	
	३. मानपत्र छपाई रुपये ५,०००/-	
	४. बॅनर छपाई व फिटींग रुपये २५,०००/-	
	५. पोस्टेज रुपये ४,०००/-	
३.	१. रंगमंच सजावट (नेपथ्य, ध्वनी, प्रकाश व्यवस्था)	९०,०००/-
	२. हॉल भाडे	५०,०००/-
	३. पुष्प सजावट	१२,०००/-
	४. रांगोळी	५,०००/-
	५. तुतारी	५,०००/-
	६. निवेदक मानधन	१०,०००/-
	७. भोजन, चहा, अल्पोपहार	१,५०,०००/-
	८. पुरस्कार विजेते (९), मान्यवर आणि अकादमी सदस्य (३४) यांची निवास व्यवस्था	१,२५,०००/-
	९. पुरस्कार विजेते (९), मान्यवर आणि अकादमी सदस्य (३४) यांचा प्रवास खर्च	८०,०००/-
	१०. सत्कारासाठी पुस्तक खरेदी	३,५००/-
	११. अंतर्गत प्रवास	१५,०००/-
	१२. छायाचित्रीकरण	२५,०००/-
	१३. जाहिरात	१५,०००/-
	१४. समन्वयक मानधन	१०,०००/-
	१५. स्वयंसेवक मानधन	१०,०००/-
	१६. शाल खरेदी	१२,०००/-
	१७. सांस्कृतिक कार्यक्रम	१,५०,०००/-
	१८. संकीर्ण	१०,०००/-
	एकूण खर्च	**८,७१,५००/-**

४. उपरोक्त खर्च विभागाचे लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, (०९) सिंधी अकादमी, (०९) (०१) सिंधी साहित्य अकादमीची आस्थापना (कार्यक्रम), (२२०५ १६९७) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून मंजूर करण्यात येत आहे.

५. यासाठी, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर खर्चास संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ उपविभाग ३, नियम २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

७. तसेच सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र. ९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ मधील परिच्छेद क्र. ७, १४, १५ आणि १६ ची पूर्तता होत असून उर्वरित सर्व परिच्छेद व परिशिष्टातील उर्वरित अटी या प्रकरणी लागू होत नाही.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८१६१२३८५४११२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.08.16 13:28:55 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. सहसंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमी, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवड नस्ती, सां.का.४.